# महाविद्यालयीन स्पर्धा

करिअर कट्टा अंतर्गत राज्य, विभागीय व जिल्हास्तरावर प्रोत्साहन स्पर्धांचे आयोजन केले जाते. ज्यामध्ये महाविद्यालयांच्या कार्याचे गुणांकनावर आधारित मूल्यांकन होते. जिल्हास्तरातून निवड होऊन राज्यस्तरावर अंतिम निवड केली जाते. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांना पारितोषिक व प्रमाणपत्र दिले जातात, तसेच विविध क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या महिलांसाठी 'आधुनिक सावित्री पुरस्कार' व ५ उत्कृष्ट करिअर संसद पदाधिकाऱ्यांना लॅपटॉपसाठी आर्थिक सहाय्य देऊन गौरविले जाते.







## महाविद्यालयीन करिअर कट्टा प्रोत्साहन स्पर्धा

करिअर कट्टाच्या वतीने सर्व सहभागी महाविद्यालयांमध्ये दरवर्षी 'राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात येते' महाविद्यालयीन करिअर कट्टा प्रोत्साहन स्पर्धा या नावाने सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार असून २०२६ –२७ या कालावधीमध्ये सहभागी महाविद्यालयाने केलेल्या कामकाजाचे ५० मार्कांचे मूल्यमापन निवड समितीमार्फत करण्यात येईल व जिल्हास्तरीय महाविद्यालयाची निवड करण्यात येईल.

राज्यातील एकूण जिल्ह्यांमध्ये प्रथम येणाऱ्या जिल्हास्तरीय महाविद्यालयांमधून राज्यस्तरीय महाविद्यालयाची निवड करण्यात येतो.

सदर निवड प्रक्रिया १० फेब्रुवारी पूर्वी पूर्ण केली जाईल व २५ फेब्रुवारीला करिअर कट्टाच्या 'वर्धापन दिनानिमित्त' प्रतिवर्षी सदर महाविद्यालयांचा 'बक्षीस वितरण समारंभ केंद्रीय पद्धतीने' आयोजित करण्यात येतो.

### महाविद्यालयीन करिअर कट्टा प्रोत्साहन स्पर्धा मानधन स्वरुप

| राज्यस्तरीय करिअर कट्टा प्रोत्साहन स्पर्धा | जिल्हास्तरीय करिअर कट्टा प्रोत्साहन स्पर्धा |
|---|---|
| राज्यस्तरीय प्रथम येणाऱ्या महाविद्यालयास<br>एक लाख रुपये रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र | जिल्हास्तरीय प्रथम येणाऱ्या महाविद्यालयास<br>सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र |
| राज्यस्तरीय द्वितीय येणाऱ्या महाविद्यालयास<br>पंचाहत्तर हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र | जिल्हास्तरीय द्वितीय येणाऱ्या महाविद्यालयास<br>सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र |
| राज्यस्तरीय तृतीय येणाऱ्या महाविद्यालयास<br>पन्नास हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र | जिल्हास्तरीय तृतीय येणाऱ्या महाविद्यालयास<br>सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र |
| विभागीय प्रथम येणाऱ्या महाविद्यालयास<br>सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र<br>विभागीय द्वितीय येणाऱ्या महाविद्यालयास<br>सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र<br>विभागीय तृतीय येणाऱ्या महाविद्यालयास<br>सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र | उत्कृष्ट प्राचार्य,<br>जिल्हास्तरीय उत्कृष्ट समन्वयक, विभागीय स्तरावर<br>उत्कृष्ट समन्वयक व राज्यस्तरीय उत्कृष्ट समन्वयक स्पर्धा<br>या प्रत्येकांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन<br>गौरविण्यात येईल. स्पर्धेमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या<br>सर्व महाविद्यालयांना व समन्वयकांना याबाबतची<br>सविस्तर माहिती कळविण्यात येईल. |

## स्पर्धेविषयी नियम व अटी

महाविद्यालयांना स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी एकूण विद्यार्थी संख्येमधून १०% गळती वजा करावी. येणाऱ्या संख्येच्या १०% किंवा १०० यापैकी जी संख्या लहान असेल ती संख्या महाविद्यालयांच्या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आवश्यक विद्यार्थी संख्या असेल.

उत्कृष्ट महाविद्यालयीन करिअर संसद, उत्कृष्ट तालुका समन्वयक, उत्कृष्ट जिल्हा नियोजन समिती तसेच उत्कृष्ट पदाधिकारी या चार वर्गांचा स्पर्धेमध्ये नव्याने सहभाग करण्यात येईल.

राज्यस्तरीय स्पर्धानियोजन समितीच्या बैठकीमध्ये स्पर्धा घोषीत करण्यापूर्वी घेण्यात आलेले निर्णय, नियम व अटी लागू असतील. या सर्वांची सविस्तर माहिती स्पर्धा घोषीत करतेवेळी दिली जाईल.